४७)

# हुरहुर

WK 10 (070-295) 11

झाल्या संध्याछाया
गर्द दाटल्या सावल्या
मनीचे पक्षी दूर उडाले
दाटला मनात काहूर ॥ १ ॥

क्षणोक्षणी, पदोपदी
आला दाटून गहिवर
सुखाच्या क्षणीसुद्धा
फुटला मनाला पाझर ॥ २ ॥

संध्येच्या या कातरवेळी
मन होते रे व्याकुळ
कुठेतरी दूरवर, नजरेपल्याड
शोधायचे आपल्या सुखाचे मूळ ॥ ३ ॥

बालपण, तारुण्य, फुलपाखरांप्रमाणे
बागडलो, नाचलो
वार्धक्याच्या खुणा पाहून
माझा मीच घाबरलो ॥ ४ ॥

सौ. अस्मिता ज्ञा. बालेकर
वंदेमातरम्, नवाथेनगर
अमरावती.

SUNDA